दै. बीड
# सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
• संपादक : अतुल शंकरराव जाधव •
• beedsuperfastgmail.com •

## मोबाईल देणार पाऊस, बाजारभाव ते उत्पादनाचा अंदाज

**मुंबई । प्रतिनिधी**
कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे शेती अधिक स्मार्ट होत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अख महाविस्तार पद्वारे शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज, मातीचे आरोग्य, कीड-रोग नियंत्रण, उत्पादनाचा अंदाज, बाजारभाव आणि कृषी शास्त्रज्ञांचे थेट मार्गदर्शन आता स्मार्टफोनवरच मिळणार आहे. त्यामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन आणि वैज्ञानिक शेतीला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे शेतीत मोठी क्रांती घडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. आतापर्यंत हवामानाचा अंदाज, कीड-रोग व्यवस्थापन, मातीचे आरोग्य, उत्पादनाचा अंदाज किंवा बाजारपेठेची माहिती मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना विविध ठिकाणी धावपळ करावी लागत होती. मात्र आता हे सर्व मार्गदर्शन एका स्मार्टफोनवर आणि तेही काही सेकंदांत उपलब्ध होणार आहे.

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक १९० ■ शुक्रवार दि. १७ जुलै, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.
■ BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-190 ■ Friday 17 July, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4

# अंबाजोगाईचा सरकारी दवाखाना सलाईनवर

# एकाच दिवशी सात डॉक्टरांच्या बदल्या

## शिष्टमंडळाने घेतली पंकजा मुंडे यांची भेट तर शिवसेनेकडून आंदोलनाचा इशारा




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**
येथील आशिया खंडातील पहिले ग्रामीण रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय म्हणून नावलौकिक असलेले स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय सध्या प्रशासकीय अनास्थेमुळे शेवटच्या घटका मोजत आहे. रुग्णालयात कोट्यवधी रुपये खर्च करून सिमेंटची जंगले आणि भव्य इमारती उभारल्या जात असताना, दुसरीकडे रुग्णांवर उपचार करण्यासाठी डॉक्टरच उपलब्ध नसल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. आधीच मनुष्यबळाचा तीव्र तुटवडा असताना, परवा रात्री अचानक एकाच दिवशी सात तज्ज्ञ डॉक्टरांची बदली करण्यात आल्याने अंबाजोगाईसह संपूर्ण बीड जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दररोज सुमारे चार हजार रुग्णांची ओपीडी असणारे हे रुग्णालय आता डॉक्टरांविना ओस पडण्याची भीती निर्माण झाली असून गरीब रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या रुग्णालयात इमारतींचे मजले वाढले, कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी नवनवीन बांधकामे झाली आणि आधुनिक यंत्रसामग्रीही दाखल झाली, परंतु ही यंत्रे चालवण्यासाठी तज्ज्ञ हातच शिल्लक राहिलेले नाहीत. आरोग्य विभागाच्या या अत्यंत उदासीन आणि कुचकामी धोरणाचा फटका गोरगरीब रुग्णांना बसत आहे. काल रात्री डॉ. राकेश जाधव, डॉ. नागेश अब्दागिरे, डॉ. अमोल कापसे, डॉ. भाऊसाहेब मुंडे, डॉ. राहुल हाके पाटील, डॉ. दीपाली कुलकर्णी यांच्यासह आणखी एका डॉक्टरची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. या बदल्या रद्द करण्यात याव्यात अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेकडून देण्यात आला आहे.

### पंकजा मुंडे यांनी दिले बदल्या रद्द करण्याचे आश्वासन

**रुग्णालयाची अत्यंत गंभीर आणि नाजूक परिस्थिती पाहता, 'स्वाराती' रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे, अधीक्षक डॉ. राकेश जाधव यांनी शिष्टमंडळासह तातडीने राज्याच्या नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेतली. या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत अधिष्ठातांनी रुग्णालयातील डॉक्टरांच्या कमतरतेची आणि सध्याच्या बिकट परिस्थितीची सविस्तर माहिती पंकजाताईंना दिली. पंकजा मुंडे यांनी या समस्येचे गांभीर्य शांतपणे ऐकून घेतले आणि रुग्णालयातील सेवा-वर्ग रद्द करण्याच्या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद दिला. या अत्यंत गंभीर विषयावर आपण स्वत: वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि संबंधित आयुक्तांशी तातडीने चर्चा करून मार्ग काढू आणि या बदल्या रद्द करण्यासाठी प्रयत्न करू, असे ठोस आश्वासन पंकजा मुंडे यांनी शिष्टमंडळाला दिले आहे. या भेटीमुळे रुग्णालयातील डॉक्टरांच्या बदल्या रद्द होण्याची आशा आता निर्माण झाली आहे.**

## तहसीलदार राकेश गिड्डे मृत्यू प्रकरणात ट्विस्ट!

**केज । प्रतिनिधी**
येथील तत्कालीन तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती निधनाचा तपास लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेने पूर्ण केला आहे. सुरुवातीला या प्रकरणावर गंभीर शंका उपस्थित करणाऱ्या गिड्डे यांच्या नातेवाइकांनी आता 'हा घातपात नसून अपघातच आहे' असा यू-टर्न घेतल्याने केज तालुक्यात व महसूल वर्तुळात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून हा तपास लातूर एलसीबीकडे वर्ग
करण्यात आला होता. सुरुवातीला तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या पत्नी, भाऊ आणि वडील यांनी महसूल खात्यातीलच काही कर्मचाऱ्यांवर संशय व्यक्त करत घातपाताची शंका उपस्थित केली होती. मात्र, लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांना जून महिन्यात गिड्डे यांच्या सर्व नातेवाइकांनी स्वाक्षरी करून एक निवेदन दिले. 'तपासाच्या रेकॉर्डवरील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर सर्व पुरावे पाहिल्यानंतर हा घातपात नसून अपघातच असल्याची आमची खात्री पटली आहे. आता आमचा कोणावरही संशय नाही,' अशी माहिती राकेश गिड्डे यांचे बंधू अक्षय गिड्डे व लातूर एलसीबीचे पोलिस निरीक्षक सुधाकर भावकर यांनी दिली.

# अनिल जगताप यांनी घेतली गोंडे परिवाराची सांत्वनपर भेट

## शिवसेनेकडून आर्थिक मदतीचा हात!



**वडवणी । प्रतिनिधी**
तालुक्यातील चिंचोटी येथील कै. माऊली दिलीप गोंडे यांचे विजेच्या तारेचा धक्का लागून अपघाती निधन झाल्याची अत्यंत दुःखद घटना घडली. या घटनेनंतर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गोंडे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी दुःखी कुटुंबीयांना धीर देत, या कठीण प्रसंगी शिवसेना आणि जगताप कुटुंब त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचा विश्वास दिला. तसेच शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत करत मदतीचा हात देण्यात आला. यावेळी शिवसेना वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे, युवासेना जिल्हाप्रमुख रवीराज बडे, माजी नगरपरिषद सभापती सुनील अनभुले, सुदर्शन धांडे,
शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संदीप माने, शिवसेना माजलगाव विधानसभा प्रमुख रामदास ढगे, ओमराजे जाधव तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी दिवंगत कै. माऊली दिलीप गोंडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. ईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती लाभो आणि गोंडे परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना करण्यात आली.

# पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत जाऊन एलसीबीची अवैध गुटख्यावर कारवाई

## एक लाखाचा मुद्देमाल जप्त ;एकावर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**
पेठ बीड पोलिसांनी मागील आठ दिवसात गुटख्यावर दोन कारवाया करत लाखोचा गुटखा व वाहने जप्त करुन गुटखा माफियांना दणका दिला. तरीही याच पोलीस ठाणे हद्दीतच गुटखा विक्री होत असल्याचे बुधवारी झालेल्या कारवाई वरुन दिसून येत आहे. बुधवारी (दि.१५) सायंकाळी एलसीबी पथकाने छापा टाकून कारवाई करीत १ लाख ४ हजार ८४० रुपयांचा गुटखा आणि सुगंधित तंबाखू असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला तर एकजणावर गुन्हा दाखल केला मात्र आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. बीड जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत आणखी एक मोठी कारवाई करत पेठ पोलीस ठाणे हद्दीतील मोहम्मदिया कॉलनी, मोमीनपुरा परिसरातून १ लाख ४ हजार ८४० किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाचा समावेश आहे. दि.१५ रोजी अवैध धंद्यांवर कारवाईसाठी पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहितीच्या आधारे सायंकाळी मोहम्मदिया कॉलनी येथे एका घरात गुटखा विक्रीसाठी ठेवली असल्याची माहिती मिळाली असता त्या ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यावेळी
संशयित शहबाज अब्दुलरजाक मोमीन हा मोमीनपुरा भागात गुटख्याच्या दोन गोण्या घेऊन उभा असल्याचे दिसून आले. मात्र पोलिसांना पाहताच
त्याने गोण्या जागीच टाकून घराच्या मागील दरवाजातून पलायन केले. पंचांसमक्ष गोण्यांची तपासणी केली असता त्यामध्ये गोवा-१०००, विमल पान मसाला, के.एन.-०१ जाफराणी जर्दा, रॉयल २२० तंबाखू, रॉयली ७१७ टोबॅको

» पान २ वर

# हसतखेळत शिक्षण घेण्याच्या वयात परळीच्या विद्यार्थ्यांवर आंदोलनाची वेळ!

## व्यवस्थापन,शिक्षक अन् शिक्षण विभागाच्या संवेदनशीलतेचा अंत?




**परळी वै. । प्रतिनिधी**
परळी वैजनाथ शहरातील सर्वात जुनी आणि नावाजलेली शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या वैद्यनाथ विद्यालयाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, शाळेतील प्रशासकीय गोंधळ, शिक्षकांची कमतरता आणि नऊ महिन्यांपासून रखडलेले पगार यामुळे शिक्षण व्यवस्थेचे अक्षरशः तीन तेरा वाजले आहेत. या सर्व परिस्थितीचा फटका मात्र निरागस विद्यार्थ्यांना बसत असून, खेळण्याच्या व शिक्षण घेण्याच्या वयात विद्यार्थ्यांवरच आंदोलन करण्याची वेळ आली आहे. यामुळे पालकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.शाळेच्या व्यवस्थापनावर सुरू असलेल्या कायदेशीर वादामुळे ही संस्था वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. सध्या शाळेचा कारभार प्रशासकाकडे असल्याचे सांगितले जाते मात्र प्रशासक नेमका कोण? स्पष्ट नसल्याने कारभार पूर्णपणे भरकटल्याची भावना व्यक्त होत आहे. एकेकाळी शाळेत ४२ शिक्षक कार्यरत होते. २६ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले

» पान २ वर



बीड:- महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांचे वडील हाजी गुलामनबी कासमशा काझी यांचे मंगळवारी रात्री निधन झाले. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी समीर काझी यांच्या बीड येथील निवासस्थानी भेट देऊन काझी कुटुंबाचे सांत्वन केले.

### योजना आहेत,निधी आहे; मग लाभार्थी वंचित का?

# गरोदर माता, स्तनदा माता व बालकांच्या योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह

**महिला सरपंचांच्या गावातच महिला व बालकांच्या प्रश्नांकडे लक्ष देणार का?**

**नेकनूर । प्रतिनिधी**
लहान बालकांचे आरोग्य,गरोदर माता व स्तनदा मातांचे पोषण यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत.मात्र,या योजनांचा प्रत्यक्ष लाभ नेकनूर ग्रामपंचायत हद्दीतील पात्र लाभार्थ्यांना वेळेवर आणि नियमित मिळतोय का,याबाबत आता नागरिकांमधून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.महिला व बालविकास विभागामार्फत अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून गरोदर माता,स्तनदा माता आणि बालकांना पोषण आहार (खाऊ) दिला जातो.मात्र,प्रत्येक महिन्याला हा आहार नियमित वाटप होतो का?लाभार्थ्यांना वेळेवर पोषण आहार मिळतो का? याची ग्रामपंचायत प्रशासनाकडून प्रत्यक्ष तपासणी केली जाते का,असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.अनेकदा वरून आहार आला नाही किंवा पुरवठा झाला नाहीअशी कारणे सांगितली जातात.मात्र, या कारणांची सत्यता तपासण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाकडून अंगणवाडी केंद्रांची पाहणी केली जाते का,

» पान २ वर



# शहरे वाचवायची असतील तर

भिकार शहरांचा देश महासत्ता होऊच शकत नाही, सबब आधी शहरे सुधारणे गरजेचे आहे, ही 'लोकसत्ता'ची भूमिका वाचकांस विदित आहेच. महाराष्ट्र सरकारचा सहावा वित्त आयोग तीस पुष्टी देतो. या आयोगाचे प्रमुख नितीन करीर यांनी राज्याचे मुख्य सचिवपद भूषवलेले आहे आणि कारकीर्दीत अनेक शहरांचा अनुभव असल्याने त्यांना आपल्या शहरांचे नेमके दुखणे काय याचा पुरेपूर अंदाज आहे. वित्त आयोगाचा अहवाल सादर करताना ते या आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहिले. या बद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. ते करण्याची गरज आहे याचे कारण अनुभव असा की अनेकदा अधिकारी वर्ग सत्ताधीशांचा कल बघून आपली भूमिका बेततो आणि त्यानुसार निरीक्षणे नोंदवतो. शहरांचे प्रतिनिधित्व करताना त्यांच्या अडचणी मांडायच्या आणि मंत्रालयात आल्यावर सरकार या शहरांसाठी अधिक काही कसे करू शकत नाही; असा युक्तिवाद करायचा. ही अशी लवचीकता आपल्याकडील व्यवस्थेत गरजेची असते हे मान्य केले तरी किमान काही मुद्द्यांवर अधिकारीगणांनी जे रास्त त्याची कड घ्यायला हवी. वित्त आयोगाचा अहवाल सादर करताना करीर ते घेतात. म्हणून त्यांचे अभिनंदन. ते केल्यानंतर त्यांच्या अहवालातील शिफारशींविषयी. कर आकारणी दोन पातळ्यांवर होते. केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारांच्या. केंद्र त्यांनी कमावलेल्या करांतील काही वाटा राज्यांस देते आणि राज्ये आपल्या स्वतंत्र उत्पन्नाचा काही हिस्सा आपल्या हद्दीतील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती यांच्याकडे वर्ग करते. महाराष्ट्र सरकार आपल्या कर कमाईतील ९६ हजार ७३३ कोटी रु. इतकी रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांत वाटते. हे प्रमाण राज्याच्या एकूण कर उत्पन्नाच्या २६.३ टक्के इतके भरते.

इतक्या रकमेच्या वाटपानंतरही आपल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न आणि खर्च यात ८,२१७ कोटी रुपयांची तफावत राहते. ही रक्कम राज्याच्या एकूण महसुलाच्या फक्त ३.६ टक्के इतकी आहे. राज्याने आपल्या उत्पन्नातील आणखी एक टक्का स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करावा अशी शिफारस हा वित्त आयोग करतो. म्हणजे हे प्रमाण २६.३ टक्क्यांवरून २७.३ टक्के इतके होईल. अर्थात या एका टक्क्याने शहर, नगरे आणि ग्रामपंचायती यांचे भागणारे नाही. हे लक्षात घेऊन वित्त आयोग काही महत्त्वाच्या शिफारशी आपल्या अहवालात करतो. त्या सगळ्याच स्तुत्य आणि म्हणून स्वागतार्ह आहेत. यात सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो व्यावसायिक कर (प्रोफेशनल टॅक्स) आकारणीचा. विविध व्यावसायिक, व्यापारी, कलाकार, पत्रकार आदींच्या मासिक वेतनातून हजारभर रुपये राज्य सरकारकडून या करापोटी वसूल केले जातात. वास्तविक या कराची आकारणी १९७५ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून होत असे. तथापि त्या वर्षी राज्याने 'महाराष्ट्र स्टेट टॅक्स ऑन प्रोफेशन्स, ट्रेड्स एड एम्प्लॉयमेंट क्ट' या कायद्यात सुधारणा केली आणि या कर आकारणीचे अधिकार आपल्या हाती घेतले. म्हणजे जो कर शहरांकडून आकारला जात होता तो राज्य सरकार आकारू लागले. यातून शहरांच्या कमाईचे एक साधनच राज्य सरकारने काढून घेतले. हा व्यावसायिक कर आकारणीचा अधिकार पुन्हा एकदा स्थानिक स्वराज्य संस्थांस बहाल करावा अशी महत्त्वपूर्ण शिफारस नितीन करीर यांचा वित्त आयोग करतो. हे असे केल्यास राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नात जी वाढ होईल ती राज्याच्या एकूण कर महसुलाच्या ०.८ टक्के इतकी असेल. अलीकडे मोटार खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. त्या खरेदीवरील कर उत्पन्नात स्थानिक स्वराज्य संस्थांसही वाटेकरी करून घ्यावे असेही हा आयोग सुचवतो. म्हणजे उदाहरणार्थ पुणे/ ठाणे/ नागपूर/ नाशिक/ औरंगाबाद अशा जिल्ह्यांतून जी काही मोटार खरेदी होईल त्यातून जमा होणार्या कराचा ०.६ टक्के वाटा पुन्हा त्या त्या जिल्ह्यांकडे वर्ग केला जावा, असे या आयोगातील तज्ज्ञांस वाटते. या निधीचा उपयोग स्थानिक शहरांस जसा होईल तसाच त्याचा उपयोग त्या त्या जिल्ह्यातील रस्तेविकासार्थही करता येईल. सद्य:स्थितीत असा वाहन करातील वाटा फक्त महापालिकांनाच मिळतो. जिल्हा परिषदा वा अन्य ग्रामीण स्वराज्य संस्था यापासून वंचित आहेत. त्यामुळे ही शिफारस ग्रामीण महाराष्ट्रासाठी रास्त ठरेल. ग्रामीण महाराष्ट्रासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण शिफारस हा आयोग करतो. ती आहे कृषक जमिनीचे रूपांतर अकृषक जमिनींत केल्यानंतर राज्यास मिळणार्या उत्पन्नातील वाटा जिल्हा परिषदा वा अन्य यंत्रणांस देण्याबाबत. जमिनींच्या रूपांतरणातून १० टक्के अधिभार स्थानिकांस दिला जावा अशी ही शिफारस. पंचायती वा जिल्हा परिषदांकडे मोठ्या प्रमाणावर जमिनी पडून असतात. या जमिनी दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यांवर देण्याचा अधिकार संबंधितांस दिला जावा हा प्रस्तावदेखील स्वागतार्ह.

राज्यात २९ महापालिका आहेत. या सर्व महापालिकांस पतमानांकन करून घेणे अनिवार्य केले जावे आणि त्यांना २०३० सालच्या मार्च महिन्यापर्यंत एक तरी रोखे मालिका विकण्याची सक्ती केली जावी असे हा आयोग सुचवतो. या संदर्भात आपल्याकडे बोलणेच खूप. मुंबई महापालिका तर गेले दशकभर या संदर्भात तयारी करत असल्याचे विविध टप्प्यांवर कानावर येते. जॉनी जोसेफ हे २००४ ते २००७ या काळात मुंबई महापालिकेचे आयुक्त असताना त्यांनी या संदर्भात तशी वाच्यता केली होती. पुढे कुठे माशी शिंकली हे कळलेले नाही. पण आपल्या महापालिका बाजारांतून पैसा उभा करण्यास कचरतात; हे निश्चित. कदाचित तसे केल्यास पारदर्शकता अनिवार्य असल्याने सत्ताधीशांकडून त्यांस हिरवा कंदील मिळत नसावा. शहरे आणि शहरांच्या सीमेवर असणारी खेडी यांच्यासाठी महसुलाचा वाटा वाढवणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम असणार्या, चांगली कामगिरी करणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांस विशेष प्रोत्साहन, खासगी आस्थापनांस अनिवार्य असणारा सामाजिक उत्तरदायित्व निधी शहरी विकास योजनांसाठी स्वीकारण्याची अनुमती इत्यादी या अहवालातील अन्य सूचनाही सोप्या आणि अंमलबजावणी योग्य आहेत. राज्यातच नव्हे; खरे तर वाहतूक नियमांचे पालन न करणे हा आता नियम झाल्यासारखी स्थिती आहे. त्यात सुधारणा होईल तेव्हा होईल. परंतु वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्यांकडून जो दंड वसूल केला जातो त्यातील २० टक्के वाटा हा स्थानिक स्वराज्य संस्थेस मिळायला हवा या आयोगाच्या प्रस्तावाचे सर्वच स्तरावर स्वागत होईल. यातील एकाही मुद्द्यासाठी वा बदलासाठी घटनादुरुस्ती आदी वेळखाऊ मार्गाची गरज नाही. हे सारे बदल केवळ प्रशासकीय आदेशांवर करणे शक्य आहे. ती करण्याची हिंमत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवायला हवी. राज्यात गृहखात्याप्रमाणे अर्थखात्याची धुराही त्यांच्याकडे आहे. म्हणजे एका हातातून काढायचे आणि ज्या दुसर्या हाती द्यायचे तो हातही त्यांचाच आहे. तेव्हा त्यांच्याच सरकारच्या वित्त आयोगाच्या शिफारशी स्वीकारणे त्यांस जड नाही. त्या स्वीकारण्याचे धैर्य त्यांनी दाखवावे. नियोजनशून्यता, सरकारी अनास्था आदींमुळे आधीच बेजार झालेली शहरे बेजानही होण्यापासून रोखायचे असेल तर या आयोगाच्या शिफारशी हा काही प्रमाणात तरी त्यावर उतारा असेल.

## पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

### पेठ बीड पोलीस...

आणि व्ही-१ टोबॅको आदी विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आला. असा १ लाख ४ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी शहबाज अब्दुलरजाक मोमीन, रा. मोहम्मदिया कॉलनी, मोमीनपुरा, बीड याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेखर औटी, पो. ह. अशोक दुबाले, पो.ह. गोविंद राख, अंकुश वरपे, महिला पो. ह. स्वाती मुंडे, तसेच पोलीस अंमलदार बबन सलगर, मनोज परजणे, पो.अं. अशफाक सय्यद, सुनील राठोड यांनी केली.

### गरोदर माता, स्तनदा...

हा प्रश्न आहे.तसेच एखादी गरोदर माता किंवा स्तनदा माता काही कारणास्तव पोषण आहार घेण्यासाठी आली नाही,तर त्या आहाराचे पुढे काय केले जाते? तो शासनाकडे परत पाठविला जातो का,की त्याची नोंद करून इतर कोणत्या पद्धतीने वापर केला जातो,याची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.

अंगणवाडी केंद्रातील आहार वाटप रजिस्टर,लाभार्थी नोंदणी,उपस्थिती नोंदी तसेच बालकांच्या आरोग्य तपासणीची माहिती नियमित तपासली जाते का, याकडेही लक्ष देण्याची गरज आहे.लहान बालकांची घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी,वजन तपासणी,कुपोषित बालकांची ओळख आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन यासारख्या बाबी प्रभावीपणे राबवल्या जात आहेत का,याचीही पाहणी होणे गरजेचे आहे.नेकनूर ही मोठी ग्रामपंचायत असून येथे मोठ्या प्रमाणावर महिला व बालकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळणे अपेक्षित आहे.मात्र,योजना केवळ कागदावर न राहता त्याचा प्रत्यक्ष फायदा गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही ग्रामपंचायत आणि संबंधित विभागाची जबाबदारी आहे.

विशेष म्हणजे,नेकनूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी महिला विराजमान आहेत. त्यामुळे महिला,गरोदर माता,स्तनदा माता आणि बालकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांकडे त्या विशेष गांभीर्याने लक्ष देतील का,असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.अंगणवाडी केंद्रांची पाहणी करून पोषण आहार वितरणाची माहिती घेणे आणि महिलांच्या समस्या समजून घेण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित असल्याची भावना व्यक्त होत आहे.ग्रामपंचायत प्रशासनाने प्रत्येक अंगणवाडी केंद्राचा आढावा घेऊन पोषण आहार वितरण,लाभार्थ्यांची संख्या आणि आरोग्य सुविधांची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून द्यावी,अंगणवाडीच्या योजना कोट्यवधींच्या,पण लाभार्थ्यांच्या ताटात काय? आता हा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे.

### खा.डॉ.श्रीकांत शिंदे...

दि. १३ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास मुंबई येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यात डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी सर्व नवप्रवेशितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत त्यांच्या भावी राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मंत्री मा. भरतसेठ गोगावले आणि शिवसेना उप नेत्या संगीताताई ठोंबरे, राज्य संघटन प्रमुख आनंद परांजपे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक उपस्थित होते.

अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून माजलगावात उबाठाला मोठा धक्का!

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल नगर जगताप यांच्या माध्यमातून माजलगावचे माजी नगरसेवक राम आनंद जगताप यांच्यासह अविनाश विश्वनाथ गोंडे (संचालक, छत्रपती सहकारी साखर कारखाना तथा माजी सरपंच, मोठेवाडी), ईश्वर प्रकाशराव होके (पाटील) (माजी नगरसेवक, माजलगाव), शिवकुमार भास्करराव माने (सरपंच, सुरूमगाव), उद्धवराव विठ्ठलराव धुमाळ (माजी संचालक, सहकारी साखर कारखाना), बबन थावरा पवार (माजी सरपंच, मोगरा), रणजीत भगवान जोगडे (संचालक, सेवा सहकारी सोसायटी), कुणाल मनोहर सोळंके (युवक नेते), अंगद शंकर खेत्री (ग्रामपंचायत सदस्य), जगन्नाथ सखाराम खेत्री (ग्रामपंचायत सदस्य), मोहन नवनाथराव थावरे (युवा नेते), मनोज थावरे (उपसरपंच), राजेभाऊ प्रभाकर पाष्टे (पत्रकार, दैनिक लोकमत), अर्जुन राजेभाऊ पांढरपोटे (चेअरमन, सह्याद्री अर्बन बँक) आणि बाळासाहेब बाबासाहेब तौर (चेअरमन, श्री दत्त अर्बन बँक) यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी बळकट झाली असून आगामी काळात पक्षाची ताकद अधिक वाढण्यास मदत होणार असल्याची भावना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### पारदर्शक कारभारासाठी विरोधकांच्या...

ढकलण्याची मागणी केली. काल सायंकाळी मुख्याधिकारी यांनी त्यांना ठरावांच्या प्रती उपलब्ध करून दिल्यानंतर अभ्यासासाठी वेळ आवश्यक असल्याचे त्यांनी मांडले. महत्त्वाची बाब म्हणजे, मुख्याधिकाऱ्यांनी उपलब्ध करून दिलेले सर्व ठराव यापूर्वीपासूनच बीड नगर परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होते. तरीही विरोधी गटाच्या गटनेत्यांनी अभ्यासासाठी हार्ड कॉपी देण्याची मागणी केली. लोकशाही प्रक्रियेचा आदर राखत आणि पारदर्शक प्रशासनाचा आदर्श निर्माण करण्यासाठी सत्ताधारी पक्षाने कोणताही आक्षेप न घेता त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच मागील अनेक वर्षांपासून बीड नगर परिषदेचा कारभार पारदर्शक, जबाबदार आणि लोकाभिमुख असावा, यासाठी आम्ही सातत्याने आग्रही राहिलो आहोत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते फारूक पटेल आणि मी अमर नाईकवाडे या मागणीला अनुमोदन दिले. त्यानंतर नगराध्यक्षा प्रेमलता ताई पारवे व उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन, पारदर्शक प्रशासनाच्या भूमिकेला प्राधान्य देत कालची सर्वसाधारण सभा तहकूब करण्याचा निर्णय घेतला. मात्र दुर्दैवाने, माध्यमांसमोर वस्तुस्थिती मांडताना ठराव आधीपासूनच ऑनलाइन उपलब्ध होते आणि हार्ड कॉपीच्या मागणीचा मान राखण्यासाठीच सभा तहकूब करण्यात आली, ही बाब सांगण्याचा मोठेपणा विरोधकांकडून दिसला नाही. लोकशाहीत मतभेद असू शकतात; मात्र सत्य, पारदर्शकता आणि जबाबदारी यांनाच सर्वाधिक महत्त्व असले पाहिजे असे मत अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केले.

### गेवराई पोलिसांचा अवैध...

तयार करून ही मोहीम राबवली.पहिली कारवाई १३ जुलै २०२६ रोजी पहाटे ३.१० वाजण्याच्या सुमारास दरबारज पार्क परिसरात करण्यात आली. पेट्रोलिंगदरम्यान भारत बेंझ कंपनीचा एमएच-१२-क्यूजी-४४९७ क्रमांकाचा हायवा अवैध वाळू वाहतूक करताना आढळून आला. पोलिसांनी वाहनासह वाळू असा २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार सुंदर राठोड करीत आहेत.दुसरी कारवाई त्याच दिवशी रात्री १०.५० वाजता करण्यात आली. गेवराई शहरातील साठेनगर येथून मोंढा नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर अशोक लेलँड कंपनीचा विना क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा बडा दोस्त पिकअप अवैधरित्या वाळू वाहतूक करताना आढळला. पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन ७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश गव्हाणे करीत आहेत.

या दोन्ही कारवायांमध्ये एकूण २७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक श्रीमंत उबाळे, पोलीस हवालदार कल्याण राठोड, गोरक्ष डोके, जितेंद्र ओव्हाळ, रामराजे काकडे, विनोद कुटे तसेच चालक इस्माईल शेख व राजेंद्र सांगळे यांनी सहभाग घेतला.

### जिल्हा क्रीडा संकुलासाठी...

खेळाडूंना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सुरुवातीपासूनच आग्रही होत्या. या संकुलाच्या निधी वितरणात व प्रशासकीय मंजुऱ्यांमध्ये येणारे अडथळे दूर करून, अंदाजपत्रकाला मंत्रिमंडळाची अंतिम कार्योत्तर मान्यता मिळवून देण्यात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.मंत्रिमंडळाच्या आजच्या या निर्णयामुळे बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या उर्वरित कामांना मोठी गती मिळणार असून, या भागातील क्रीडा संस्कृतीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केला याबद्दल आमदार विजयसिंह पंडित जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण नगराध्यक्ष प्रेमलता ताई पारवे उपाध्यक्ष विनोद मुळूक सभापती शेख निजाम आदींनी पालकमंत्री यांचे विशेष आभार मानले.

### बीडमध्ये चॅम्पियन्स तायक्कांदो...

रो. संतोष पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे यांनी केले.मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंना बेल्ट व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी तायक्कांदो हा केवळ स्वसंरक्षणाचा खेळ नसून शिस्त, आत्मविश्वास, संयम आणि शारीरिक-मानसिक विकास घडविणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करावे, असा संदेश त्यांनी दिला. आंतरराष्ट्रीय खेळाडू कु. नयन बारगजे, राष्ट्रीय पातळीवरील पदक विजेते ओंकार परदेशी, कार्तिकी मिसाळ, यशस्वी चव्हाण, ऋत्विक तांदळे, समर्थ आंधळे , राष्ट्रीय पंच शेख अनिस यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास खेळाडू, पालक, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन चॅम्पियन्स तायक्कांदो अकॅडमीच्या वतीने करण्यात आले. शेवटी सर्व मान्यवर, पालक आणि उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

जागतिक विद्यापीठाकडून ब्लॅक बेल्ट प्रमोशन पदवी

दक्षिण कोरिया येथील जागतिक विद्यापीठा अंतर्गत भारतीय महासंघा कडून बीड च्या सुमित राऊत, सर्वेश पवार , कृष्णा डाके, वेदांत काकडे, स्वराज ढास, श्रेयस वाव्हळ, अद्वैत शेटे ,भरत महानुवार, शाम घाडगे , दिपक अग्रवाल, सार्थक राख, सर्वेश शेळके , कृष्णा जगताप, विश्वजीत पाटील , शौर्य चव्हान, प्रतिक कांबळे , कु. शरयु शेळके, कु.भाग्यश्री राख , कु. राघवी रामदासी , कु. स्वस्तिश्री बिल्पे, कु. कृतिका रुईकर यांना यावेळी ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आले.

### आरक्षण उपवर्गीकरण रद्द...

प्रमुख उपस्थितीत सभा पार पडली. यावेळी उपस्थित आंदोलकांनी महाराष्ट्र शासनाच्या भूमिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र निषेध व्यक्त केला.आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय तातडीने मागे घ्यावा तसेच भारतीय संविधानाने अनुसूचित जातींना दिलेल्या आरक्षणाच्या अधिकाराला धक्का पोहोचवणारे कोणतेही पाऊल शासनाने उचलू नये, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली. तब्बल साडेतीन तास कडक उन्हाची तमा न बाळगता आबालवृद्ध, महिला, युवक व तरुणींनी सभेला उत्स्फूर्त उपस्थिती लावून आंदोलनाला भक्कम पाठिंबा दर्शविला. या मोर्चाचे आयोजन अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ मायंदळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी विलास शिंदे, वामन पाईक, रानबा उजगरे, डॉ.संजय नाकलगावकर, इंजि. प्रशांत उघडे यांच्यासह कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोर्चाच्या नियोजनाची जबाबदारी सांभाळली.

महाराष्ट्र शासन आरक्षण उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील महार व मातंग समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. मातंग समाजातील काही नेते सत्ताधाऱ्यांच्या प्रभावाखाली राहून अनुसूचित जातीतील जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप मान्यवर वक्त्यांनी केला. अनुसूचित जाती आरक्षणातील 'अ, ब, क, ड' अशा उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा सरकारचा मनसुबा असून, तो कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ देणार नसल्याचा निर्धार सर्व वक्त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला.

### गोरगरीबांच्या हक्काचा पीटीआर...

वतीने तात्काळ पीटीआर वाटप करा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर देऊन त्यांना शासनाच्या घरकुल योजनेत हक्काचे घर देण्याची शासनाची भुमिका आहे. सन २००४ पासून नगर परिषदेची सत्ता भोगणाऱ्यांनी सातत्याने पीटीआरच्या प्रश्नावर राजकीय पोळी भाजून स्वतःच्या राजकारणासाठी त्याचा वापर केला. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी पहिल्यांदा हा प्रश्न विधीमंडळात मांडल्यानंतर खऱ्या अर्थाने त्याला दिशा मिळाली. आ. विजयसिंह पंडित यांनी नगर परिषदेच्या प्रशासकीय कार्यकाळात शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तत्कालीन पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्याहस्ते गेवराई शहरात भव्य कार्यक्रमात अतिक्रमण धारकांना पीटीआरचे वाटप करण्यात आले. या काळात सुमारे अडीच हजार अतिक्रमण धारकांचे पीटीआर तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना नगर परिषदेची आचारसंहिता लागली. नगर परिषद निवडणुकीतील पराभवानंतरही आ. विजयसिंह पंडित यांनी या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा सुरु केला. या बाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे आढावा बैठक घेऊन पीटीआर वाटप करण्याचे निर्देश दिले.

मंगळवार, दि.१४ जुलै रोजी गेवराई नगर परिषदेचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे गटनेते शेख खाजा, अक्षय पवार, समाधान मस्के, आनंद दाभाडे, सतिष प्रधान, विजय सुतार, नईम कुरेशी, सय्यद सुभान, जफर कुरेशी, बाबासाहेब घोडके, इम्रान अन्सारी, बाळासाहेब दाभाडे, ओम खाकरे, सलमान सय्यद, गणेश रुकर यांच्यासह आदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी गेवराई नगर परिषदेमध्ये निवेदन देऊन अतिक्रमण धारकांच्या पीटीआरचे राजकारण न करता त्यांना तात्काळ पीटीआर उपलब्ध करून घरकुलाचा लाभ देण्याची मागणी केली. याकामी विलंब झाल्यास आंदोलनाची भुमिका घेण्यात येईल असा इशारा गटनेते शेख खाजा यांनी दिला. शहरातील गोरगरीबांच्या पीटीआर वाटपाचे श्रेय कोणीही घेऊ नये असा टोला त्यांनी यावेळी लगावला. पीटीआर वाटपास नगर परिषदेतील सत्ताधारी जबाबदार असून आता ते पीटीआरचे श्रेय घेणार असतील तर त्याच्या भ्रमाचा भोपळा गेवराईकर फोडल्याशिवाय राहणार नाहीत असाही टोला यानिमित्ताने त्यांनी लगावला.

### हसतखेळत शिक्षण घेण्याच्या...

असून सध्या केवळ १६ शिक्षक शिल्लक आहेत. त्यातही आठ शिक्षक नियमित गैरहजर राहत असल्याचा आरोप होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे अध्यापन पूर्णपणे विस्कळीत झाले असून शिक्षणाच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम होत आहे. इतकेच नव्हे तर, शाळेला नियमित मुख्याध्यापकही नाहीत. त्यामुळे प्रशासकीय निर्णय, शैक्षणिक नियोजन आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम नेतृत्वच नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तब्बल नऊ महिन्यांपासून वेतन रखडले आहे. पगारासाठी शिक्षकांनी काही दिवसांपूर्वी आंदोलनही केले होते. मात्र त्यानंतरही शिक्षण विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याने शिक्षकांसह पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या सर्व प्रकाराकडे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत असून, विद्यार्थ्यांचे भवितव्य अक्षरशः वाऱ्यावर सोडण्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.ही परिस्थिती असह्य झाल्याने गेल्या दोन दिवसांपासून विद्यार्थ्यांनीच आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. आज गुरूवार सकाळपासून विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात उपोषण आणि निदर्शने सुरू केली. न्यायाची मागणी करणाऱ्या चिमुकल्यांचे दृश्य पाहून नागरिकही हळहळ व्यक्त करत आहेत. शाळेत शिक्षण मिळावे म्हणून विद्यार्थी येतात; आंदोलन करायला नाही,अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांकडून व्यक्त होत आहे. खेळण्याच्या वयातील मुलांना आंदोलन करावे लागत असेल, तर ही केवळ एका शाळेची शोकांतिका नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाची कबुली असल्याचे मतही व्यक्त होत आहे. परळीतील ऐतिहासिक वैद्यनाथ विद्यालयाची होत असलेली ही वाताहत थांबविण्यासाठी शासन, शिक्षण विभाग आणि संबंधित प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून शिक्षकांची उपलब्धता, मुख्याध्यापकांची नियुक्ती, रखडलेले वेतन आणि व्यवस्थापनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी पालक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून होत आहे.

# शिक्षणाची गुणवत्ता घसरतेय का?

## करिअरमधील संभ्रम आणि शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण ही गंभीर चिंतेची बाब

**जच्या वेगाने बदलणाऱ्या युगात शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्या आहेत. नवीन अभ्यासक्रम, विविध करिअर पर्याय, आधुनिक तंत्रज्ञान आणि वाढत्या शैक्षणिक संस्था यामुळे विद्यार्थ्यांसाठी अनेक दारे खुली झाली आहेत. मात्र या सकारात्मक बदलांसोबत काही गंभीर समस्या देखील समोर येत आहेत. शिक्षणाची घसरती गुणवत्ता, करिअर निवडीतील संभ्रम आणि शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण या विषयांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.**

परंपरागत शिक्षण अभ्यासक्रम आजही अनेक संस्थांमध्ये जुन्याच स्वरूपात शिकवले जात आहेत. उद्योग, तंत्रज्ञान आणि समाजाच्या बदलत्या गरजांनुसार अभ्यासक्रमामध्ये आवश्यक ते बदल आणि अद्ययावतता अनेक ठिकाणी वेळेवर होत नसल्याने विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्ये विकसित करण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करावे लागत आहेत. सध्याच्या काळात विद्यार्थ्यांसमोर करिअरचे असंख्य पर्याय उपलब्ध आहेत. ही बाब निश्चितच सकारात्मक असली तरी योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे अनेक विद्यार्थी आणि पालक निर्णय घेण्यात गोंधळून जातात. विद्यार्थ्यांना अक्षरशः कळत नाही की काय करावे? कसे करावे? कुठे करावे? आणि केव्हा करावे? त्यांना करिअर मार्गदर्शनाची किंवा आपण म्हणू शकतो की करिअर समुपदेशनाची गरज आहे. अपूर्ण किंवा अप्रमाणित माहितीच्या आधारे घेतलेले निर्णय विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आव्हानात्मक ठरू शकतात. करिअर नियोजनासाठी प्रभावी मार्गदर्शन आणि अनुभवी मेंटॉरशिपची कमतरता हीदेखील गंभीर समस्या आहे. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी आपल्या आवडी, क्षमता आणि भविष्यातील संधी यांचा समतोल साधून अधिक सुजाण निर्णय घेऊ शकतात. गेल्या काही वर्षांत महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. उच्च शिक्षणाची उपलब्धता वाढणे ही स्वागतार्ह बाब असली तरी प्रत्येक संस्थेमध्ये समान दर्जाचे शिक्षण, आवश्यक सुविधा आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध असतीलच असे नाही.

त्यामुळे गुणवत्तेतील असमतोल हा महत्त्वाचा प्रश्न बनत आहे. विद्यापीठांकडून शैक्षणिक गुणवत्तेचे नियमित मूल्यमापन, अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन आणि संस्थांची प्रभावी गुणवत्ता तपासणी अधिक बळकट होण्याची आवश्यकता असल्याचे अनेक शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. गुणवत्ता तपासणीची प्रभावी व्यवस्था विद्यार्थ्यांच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. विद्यापीठाने नवीन परवानग्या देण्याऐवजी विद्यमान महाविद्यालये आणि परिसर अधिक बळकट करावेत. तसेच प्राध्यापकांना शैक्षणिक विकासासाठी अधिक संधी उपलब्ध करून द्याव्यात. शिक्षण क्षेत्र सतत बदलत असताना शिक्षकांनीही नवीन तंत्रज्ञान, अध्यापन पद्धती आणि उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. मात्र काही ठिकाणी आवश्यक अद्ययावततेसाठी अपेक्षित सहकार्य किंवा सहभाग दिसून येत नाही. परिणामी विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान आणि कौशल्यांचा पुरेसा लाभ मिळण्यात अडचणी निर्माण होतात. शिक्षकांनी तंत्रज्ञान आणि एआयच्या सध्याच्या गरजांशी जुळवून घेणारे असले पाहिजे. त्यांनी काळानुसार आणि गरजेनुसार आपले ज्ञान अद्ययावत केले पाहिजे, तरच ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतील. आज आपल्याला केवळ शिक्षकांची गरज नाही, तर मार्गदर्शकांची गरज आहे; आणि प्रत्येक शिक्षक हा मार्गदर्शक असला पाहिजे. दर्जेदार आणि अनुभवी अध्यापन कर्मचारी उपलब्ध होणे ही अनेक संस्थांसमोरील मोठी समस्या बनली आहे. विषयातील प्रभुत्व, अध्यापन कौशल्य आणि औद्योगिक क्षेत्रातील गरजाचा अनुभव असलेले शिक्षक मर्यादित प्रमाणात उपलब्ध असल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होऊ शकतो. अनेक महाविद्यालये केवळ संख्येसाठी शिक्षकांची नियुक्ती करतात किंवा उक्ष व्याख्यानांच्या माध्यमातून गरजा पूर्ण करण्याचा मार्ग शोधतात, ज्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेला बाधा येते. विद्यार्थी आणि पालकांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणापेक्षा केवळ पदवी, तात्काळ नोकरी किंवा अल्पकालीन आर्थिक अपेक्षांना अधिक प्राधान्य दिले जात असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात होत आहे. शिक्षणाचा खरा उद्देश म्हणजे ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास हा असल्याची जाणीव अधिक दृढ करण्याची गरज आहे. खरं तर आपण पालकांमध्ये याबद्दल जागरूकता निर्माण केली पाहिजे, ही काळाची गरज आहे. पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की दर्जेदार शिक्षणासोबतच, आपण



**आर. डी. सय्यद**
**प्र. प्राचार्य, वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणक शास्त्र महाविद्यालय, बीड**

मुलांच्या नैतिक संस्कारांवर आणि सामाजिक जबाबदाऱ्यांवरही लक्ष केंद्रित केले पाहिजे. अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणामध्ये मोठा अडथळा ठरते. वाढते शैक्षणिक खर्च, प्रशिक्षण शुल्क, निवास आणि इतर खर्च यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार संधी मिळणे कठीण होते. शहरी आणि ग्रामीण भागातील पालकांमध्ये, शासनाकडून शिष्यवृत्तीच्या स्वरूपात दिल्या जाणाऱ्या योजना व सुविधांविषयी जागरूकता निर्माण केली पाहिजे, ज्यामुळे त्यांच्या मुलांना पुढील शिक्षणासाठी मदत होऊ शकते. तथापि, या सुविधांचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. शिक्षण क्षेत्रात वाढती स्पर्धा आणि व्यावसायिक दृष्टिकोनामुळे काही ठिकाणी शिक्षण ही सामाजिक जबाबदारी नसून केवळ व्यवसाय म्हणून पाहिली जात असल्याची भावना व्यक्त केली जाते. गुणवत्तेपेक्षा प्रवेशसंख्या, जाहिरात आणि आर्थिक उत्पन्न यांना अधिक महत्त्व दिले जाण्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. हे माझे वैयक्तिक मत आहे की, या सर्व प्रश्नांवर शासन, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रभावी करिअर मार्गदर्शन, नियमित गुणवत्ता तपासणी, शिक्षकांचे सातत्यपूर्ण कौशल्यवर्धन आणि शिक्षणातील नैतिक मूल्ये यांवर भर दिल्यास शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता अधिक सक्षम होऊ शकते. शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे माध्यम नसून सक्षम, जबाबदार आणि कुशल नागरिक घडविण्याची प्रक्रिया आहे, ही जाणीव समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे हीच काळाची गरज आहे.

# सायबर गुन्ह्यातील दोन फिर्यादीस पाच लाख रुपये मिळवून देण्यात ॲड.किशोर खेडकर यांना यश

**बीड । प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच दोन सायबर गुन्ह्याच्या फिर्यादीस मा.०५ वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड यांनी दी २९/०६/२०२६ रोजी सदरील की.फो क्र : ५५२/२०२६ व दि ३०/०६/२०२६ की.फो क्र ५५३/२०२६ या प्रकरणात ॲड. किशोर खेडकर यांनी दोन्ही फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून पाच लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.फिर्यादीचे खाते देखील सुरळीत चालू करून देण्यात आले आहे. या संबंधित प्रकरणात आज दि ०९/०७/२०२६ रोजी सुनावणीत मा. न्यायालयाने आदेश दिले. सदर प्रकरणात फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान व न्यायालयीन प्रक्रियेत ॲड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून फिर्यादीस पाच लाख रुपये देण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. या कामी ॲड.विराट बारगजे याचे सहकार्य लाभले ॲड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.



# सिरसाळा शहरात 'सिंघम'ची एन्ट्री! वाहतुकीची कोंडी फोडणारे अन् अवैध धंद्यांचे कंबरडे मोडणारे एपीआय राठोड ठरले 'कर्दनकाळ'

**सिरसाळा । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील सर्वात मोठी आणि मुख्य बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिरसाळा शहराला गेल्या अनेक दिवसांपासून वाहतूक कोंडी, वाढते अतिक्रमण आणि अवैध धंद्यांनी विळखा घातला होता. मात्र, सहाय्यक पोलीस निरीक्षक (-PI) राठोड साहेब यांनी सिरसाळा पोलीस ठाण्याची धुरा हाती घेताच शहराचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात झाली आहे. आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीने त्यांनी गुन्हेगार आणि नियम मोडणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवला आहे.



सिरसाळा बाजारपेठेत मुख्य रस्त्यावर होणारी वाहनांची बेशिस्त पार्किंग आणि व्यापाऱ्यांनी केलेले अतिक्रमण यामुळे पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले होते. एपीआय राठोड साहेबांनी स्वतः रस्त्यावर उतरून या समस्येचा निपटारा करण्यास सुरुवात केली आहे. नो-पार्किंगमध्ये लावलेली वाहने, रस्त्यात अडथळा ठरणारे ऑटो आणि बेशिस्त चालकांवर त्यांनी थेट दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यांच्या या धडक मोहिमेमुळे अनेक महिन्यांपासून कोंडलेल्या सिरसाळा शहराला अखेर मोकळा श्वास घेता आला आहे.

# अलखैर पतसंस्थेच्या वाहन तारण कर्ज योजनेतून ई-ऑटोचे वितरण

## नगरसेवक शेख मुस्तकीम बागवान यांच्या हस्ते चावी सुपूर्द

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अलखैर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अंबाजोगाईच्या वाहन तारण मुराबा कर्ज योजनेअंतर्गत ग्राहकांना सुलभ आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून टीव्हीएस कंपनीचे अत्याधुनिक इलेक्ट्रिक घळपस ए-च-द -ीं हे वाहन सोपान जालिंदर फरताडे यांना वितरित करण्यात आले. या वाहनाच्या चावीचे वितरण अंबाजोगाई शहराचे नगरसेवक मा. शेख मुस्तकीम शकील बागवान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित करत अलखैर पतसंस्थेच्या ग्राहकाभिमुख कर्ज योजनांचे कौतुक केले. या प्रसंगी शोएब भाई बागवान, आसेफ बागवान, अर्जुन काका जेधे, भागवत काळे, तसेच अलखैर पतसंस्थेचे मॅनेजर सय्यद रऊफ, कर्ज वसुली अधिकारी समीयोद्दीन सय्यद व इतर मान्यवर उपस्थित होते. ग्राहकांना सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून स्वावलंबनाला चालना देण्याच्या उद्देशाने अलखैर नागरी सहकारी पतसंस्था विविध वित्तीय योजना राबवत असून, वाहन तारण मुराबा कर्ज योजना नागरिकांच्या पसंतीस उतरू लागल्याचे यावेळी सांगण्यात आले.



# धनश्री व पियुष यांचा शाही विवाह सोहळा थाटात

## साळुंके व आखाडे परिवारात आनंदाचे उत्साहाचे वातावरण!

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील लोकप्रिय व धडाडीचे युवा पत्रकार श्री. शुभम घोडके यांचे सख्खे मामा चि. पियुष भिमराव साळुंके आणि चि. सौ. का. धनश्री शिवाजीराव आखाडे यांचा शुभविवाह मंगळवार, दिनांक ०७ जुलै २०२६ रोजी दुपारी ठीक १२ वाजून ४४ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर अत्यंत उत्साहात आणि शाही थाटात संपन्न झाला. बीड येथील पांगरी रोड परिसरातील प्रसिद्ध व भव्य 'अंबिका लॉन्स' येथे हा सोहळा पार पडला. या विवाह सोहळ्यानिमित्त साळुंके आणि आखाडे या दोन्ही परिवारांमध्ये अत्यंत आनंदाचे व मांगल्याचे वातावरण पाहायला मिळाले.या शाही विवाह सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज नेत्यांची तसेच आदरणीय संत-महंतांची उपस्थिती होती. विवाह सोहळ्याला उपस्थित राहिलेल्या सर्वच मान्यवरांनी आणि हितचिंतकांनी नवविवाहित वधू-वर चि. पियुष आणि चि. सौ. का. धनश्री यांच्यावर अक्षता टाकून त्यांना सुखी, समृद्ध आणि दीर्घायुषी वैवाहिक जीवनासाठी भरभरून आशीर्वाद दिले.'अंबिका लॉन्स' परिसर या सोहळ्यासाठी अत्यंत देखणा आणि आकर्षक रितीने सजवण्यात आला होता. पारंपरिक वाद्यांचा गजर, सनई-चौघड्यांचे सूर आणि उपस्थितांचा उत्साह यामुळे संपूर्ण विवाह सोहळ्याला एक वेगळीच भव्यता प्राप्त झाली होती. विवाह सोहळ्याला गेवराई, बीड जिल्हा तसेच परिसरातून नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साळुंके व आखाडे परिवाराच्या वतीने आलेल्या सर्व पाहुण्यांचे अत्यंत आदराने आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.या नववधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी व मान्यवरांनी सोहळ्याला हजेरी लावली होती. विशेषतः विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींसह आदरणीय संत-महंतांची , डॉक्टर, वकील ,इंजिनियर यांचीही प्रमुख उपस्थिती या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली. संत-महंतांच्या हस्ते नववधू-वरांना मंत्रोच्चारांसह आशीर्वाद देण्यात आले, ज्यामुळे विवाह सोहळ्यामध्ये आध्यात्मिक आणि मांगल्यमय वातावरण निर्माण झाले होते. साळुंके व आखाडे यांच्या परिवारातील हा कौटुंबिक सोहळा असल्याने पत्रकारिता, वकील, डॉक्टर ,इंजिनियर, व्यापारी क्षेत्रातील त्यांचे अनेक सहकारी, मित्र परिवार, तसेच दोन्ही बाजूंचे नातेवाईक, आप्तेष्ट आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत साळुंके व आखाडे परिवारातील सदस्यांनी अत्यंत आदराने व उत्साहाने केले. विवाह सोहळ्यानंतर उपस्थितांसाठी विशेष आणि चवदार भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.हा विवाह सोहळा सुरळीत आणि यशस्वी पार पाडण्यासाठी साळुंके व आखाडे परिवारातील सदस्यांनी आणि मित्रमंडळींनी व इंजिनीयर महेश शिवाजीराव आखाडे यांच्या सर्व नातेवाईकांनी अतोनात परिश्रम घेतले. उपस्थित सर्व मान्यवरांनी आणि हितचिंतकांनी चि. पियुष आणि चि. सौ. का. धनश्री यांच्या आगामी सुखकर, समृद्ध आणि आनंदी संसारिक प्रवासासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.



# संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड येथे शालेय गणवेश वाटप कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड बीड या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप कार्यक्रम नगरसेवक माननीय दत्ताजी जाधव यांच्या हस्ते ठेवण्यात आला गणवेश वाटप करण्यात आले या कार्यक्रम प्रसंगी शालेय परिसरातील सामाजिक कार्यकर्ते सादेकभाई पठाण, शेख एजाजभाई, युनूसभाई तांबोळी, विलास धनवडे, शाळेतील माजी विद्यार्थी रोहन पाचंग्रे यांचे मार्गदर्शन झाले व नंतर गणवेश वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नगरसेवक दत्ताजी जाधव म्हणाले की सर्वसाधारण कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे हा आता अवघड विषय झालेला आहे कारण इंग्लिश स्कूलचे पेव वाढवेल वाढलेले आहे त्यामुळे शिक्षण महाग झालेले आहे अशा कठीण परिस्थितीत देखील संत तुकाराम प्राथमिक शाळेने अशी उत्तुंग भरारी घेतलेली आहे त्याबद्दल शाळेचे कौतुक केले शिक्षण हेच जीवनातील यशाचे खरे साधन आहे विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवर भर न देता चांगले संस्कार सामाजिक जाणीव आणि मानवतेची भावना जर जोपासली तर आणखी चांगल्या सुधारणा विद्यार्थ्यांमध्ये होऊ शकतात यावेळी सादेक भाई बोलताना म्हणाले विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास शिस्त आणि प्रमाणिकपणाचे महत्त्व सांगितले त्यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे आणि समाजाचे जीवन उन्नत करण्याचे आवाहन केले. शिक्षणाशिवाय आता पर्याय राहिलेला नाही शिक्षण घेतल्याने माणसातील माणूसपण जागे होते असेही ते म्हणाले या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला शालेय गणवेश मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवे प्रोत्साहन मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे अध्यक्षीय समारोप प्रसंगी त्यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जाधव सर यांनी केले या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत झाली असून समाजातील विविध घटकांनी अशा उपक्रमामध्ये पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले



# बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली दैठण येथील युवकांचा भाजपात प्रवेश



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे दैठण येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. युवानेते रोहित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे स्वागत केले आहे. तुमची आमची भाजपा सर्वांची भाजपा म्हणत दैठण येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा कार्यकर्ते माऊली पंडित, बळीराम पंडित, कृष्णा पंडित, सुदर्शन गायकवाड, महेश देशमुख आणि दीपक पंडित यांनी आपल्या सहकाऱ्यांसह माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी युवा नेते रोहित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे सत्कार करून, भारतीय जनता पार्टीमध्ये स्वागत केले. गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली यापुढे काम करणार आहोत. प्रत्येकाच्या अडीअडचणीला ते सतत धावून येतात अशा खंबीर नेतृत्वाची सामान्यांना गरज असल्याच्या भावना, भाजपात प्रवेश केलेल्या या तरुणांनी व्यक्त केल्या. कोणतीही अडचण आली तर तिथेच आमच्यापर्यंत पोहोचवा ती सोडवण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाही यावेळी रोहित पंडित आणि यशराज पंडित यांनी दिली. याप्रसंगी शरद पंडित, जगदीश पंडित, विश्वराज पंडित, सुशील जामकर, सचिन पंडित आणि सह ग्रामस्थ आणि भाजपा कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# पाटोदा-नायगावच्या भूमिपुत्राची वैद्यकीय क्षेत्रात मोठी भरारी

## किर्गिज़स्तानमधून डॉ. आहाद मजीद शेख यांनी एमबीबीएस पदवी संपादन

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील नायगाव येथील भूमिपुत्र तथा सध्या बालेपीर, बीड येथे वास्तव्यास असलेले डॉ. आहाद मजीद शेख यांनी किर्गिज़स्तान या देशातून वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठेची एमबीबीएस (चइइड) पदवी यशस्वीरित्या संपादन करून आपल्या कुटुंबासह तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशानिमित्त वडील जिल्हा विस्तार अधिकारी शेख माजीद यांच्या बालेपीर, बीड येथील निवासस्थानी कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवाराच्या उपस्थितीत डॉ. आहाद शेख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या उज्ज्वल वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी अब्दुल कादर (जमाते आमिर, नायगाव), शेख जफर, शेख अजीम, शेख साजीद, पत्रकार हमीदखान पठाण, शेख अजीम सर, शेख अनस आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. आहाद शेख यांच्या यशाबद्दल नायगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.



# राजस्थान मधील घटना माणुसकीला काळिमा फासणारी

राजस्थान मधील श्रीगंगानगर जिल्ह्यात संपूर्ण देशाला हादरवून सोडणारी अत्याचाराची घटना झालेली आहे. एका १३ वर्षीय मुलीचे एका रिक्षा चालकाने अपहरण करून तिला हॉटेल मध्ये विकले व तिथे नंतर ३० राक्षसांनी सलग पाच दिवस तिच्यावर अत्याचार केला. या मुलीची अवस्था पाहून तळपायाची आग मस्तकात गेली. दवाखान्यात ती पडून होती, भयभीत झाली होती ही ताई पुर्णपणे खचली होती. तिचा आवाज ऐकून काळजाचे पाणी पाणी झाले. हृदय हेलावून टाकणारी ही घटना आहे .संबंधित नराधमांना पोलीसांनी पकडून त्यांची रस्तावर धिंड काढत त्यांना चोप दिला. पण एवढ्या वरच नाही तर भर चौकात यांना तात्काळ फाशी दिली पाहिजे हीच जनभावना आहे. छत्रपती शासना सारखा न्याय हवा जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांना रांझेगावच्या पाटलाने एका गरीब स्त्रीवर अत्याचार केल्याची माहिती मिळाली तेव्हा महाराजांनी त्याला उचलून आणून भर चौकात त्याचे हातपाय तोडले होते त्यामुळे पुढे स्वराज्यात महिलांवर वाकडी नजर करण्याची कोणाचेही हिम्मत झाली नाही. महिला मुली सुरक्षीत राहिल्या म्हणूनच शिवरायांच्या न्यायदानाची आज गरज आहे. एकदा का या राक्षसांचा चौरंग केला की पुढे संपूर्ण भारत देशात महिला सुरक्षीत राहतील. कायद्यातील पळवाटामुळे न्यायास विलंब घटना घडून अनेक दिवस झाले तरीही भितीपोटी आणि बदनामीमुळे बर्याच घटना उघडकीस येत नाहीत. कोणी हिंमत करून पुढे येतो तर त्यांना मदती आधी त्रास होतो नंतर जनरेट्याने गुन्हा तर दाखल होतो पण न्यायालयात तारीख पे तारीख या खेळाने अनेक महिने, वर्ष निघून जातात तरीही पिडीतांना न्याय मिळत नाही. कसेतरी प्रकरण निकाली लागले तर पुन्हा राष्ट्रपती कडे दयेचा अर्ज दाखल होतो व पुन्हा शिक्षेला विलंब होतो. त्यामुळे आज एका सक्षम कायद्याची गरज आहे जो नराधमांना एका महिन्यात फासावर लटकवेल. पालकांनो आपल्या मुलीकडे लक्ष द्यावे आज अशा भयानक घटना घडत आहेत म्हणून की महिला मुलींची सुरक्षा करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या मुलीची शाळा, रिक्षावाला, क्लास मध्ये जातानाची वेळ यावर करडी नजर ठेवायला हवी कुसंगतीच्या मैत्रिणींपासून आपल्या मुलीला दूर ठेवा. तिला शाळेत, व क्लास मध्ये शक्यतो तुम्हीच सोडा म्हणजे तिची सुरक्षा होईल. कृपया तिच्याकडे स्मार्टफोन देऊ नका फक्त अभ्यासाठी तिला स्वतः समोर बसून मोबाईल द्या.तिला आत्मरक्षणाचे धडे द्या, गुडटच बॅडटचचे शिक्षण द्या. आपल्या मुलीला कराटे प्रशिक्षण द्या. शक्यतो सर्व शाळांमध्ये मुलींना कराटे प्रशिक्षण द्यायला हवे. अशा घटना टाळण्यासाठी समाजाने जागृत व्हावे आपल्या सभोवताली विकृत मानसिकतेचे व्यक्ती आहेत का? ते कोणाचे अपहरण, छेडछाड तर करत नाहीत ना याकडे समाजाने लक्ष द्यायला हवे. शहरातील प्रत्येक वार्डात असे सुरक्षा रक्षक हवेत जे दिवसभर आपल्या विभागाकडे लक्ष देतील व असे कोणी राक्षस दिसले की त्याला ताबडतोब पकडून पिडीतेची सुटका व नराधमांना चोप देतील. पोक्सो अंतर्गत शिक्षा व फास्टट्रॅक कोर्टमध्ये खटला चालवा महाराष्ट्रातील नरसापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकली वर अत्याचार व हत्या करणाऱ्या नराधम भीमराव कांबळेला अवघ्या दोन महिन्यांत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली जलदगतीने शिक्षा होणारी ही महाराष्ट्र राज्यातील पहिली घटना आहे त्यामुळे या ही घटनेत खटला फास्टट्रॅक कोर्ट वर चालून या राक्षसांना पोक्सो कायद्या अंतर्गत फाशीची शिक्षा व्हायला हवी तरच या पिडीतेला न्याय मिळेल.

**लेखक**
**पवन सपकाळ**



# जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटी निधी मंजूर

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा पाठपुरावा



**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या २४.९५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास आणि निधी मंजुरीस आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात या क्रीडा संकूलाच्या उभारणीला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती.**

उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या क्रीडा संकुलाच्या निधीसाठी सातत्याने केलेल्या विशेष पाठपुराव्यामुळेच हा मार्ग मोकळा झाला आहे.बीड जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या क्रीडा संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. या क्रीडा संकुलाकरिता यापूर्वी ८ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला होता. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून सादर करण्यात आलेल्या २४.९९ कोटी रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती तसेच राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या मंजुरीच्या अनुषंगाने, ३१ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये २५ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला आहे.बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि स्थानिक तरुण » पान २ वर

## प्रभाग क्र ७ मधील वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येबाबत महावितरणकडे दिले निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांना वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने नगरसेवक जगदीश गुरखुदे व नगरसेविका सौ. भाग्यश्री सागर देशपांडे यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंता श्री.राजपुत साहेब यांना निवेदन सादर केले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सावरकर शाळा परिसर, चुन गल्ली डीपी, सराफ रोड, बोबडेश्वर गल्ली, छापखाना गल्ली, थिगळे गल्ली, जटाशंकर गल्ली, झेंड गल्ली, काळे गल्ली व माजी आमदार देशमुख गल्ली या भागात नदीपात्रातून जाणाऱ्या वीजवाहिन्या, झाडांच्या फांद्या तसेच डीपीवरील वाढता ताण यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे.या समस्येमुळे नागरिक, विद्यार्थी, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा परिणाम होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.या पार्श्वभूमीवर नदीपात्रातील वीजवाहिन्या सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित कराव्यात, आवश्यक असल्यास डीपीचे स्थलांतर करावे तसेच वाढलेला विद्युत भार कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच, समस्या त्वरित न सोडवल्यास नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## बीड नगर परिषदेत प्रथमच त्रास मुक्त कर भरणा

### वसुली विभागात कर भरणाऱ्यांनी मानले आभार–एस.एम.युसूफ़

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद च्या वसुली विभागात प्रथमच त्रासमुक्त कर भरणा केल्याचे समाधान मिळाले तसेच कर भरण्यासाठी आलेल्या नागरिकांमधून काहींनी आभार ही व्यक्त केल्याची माहिती मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड नगर परिषदेच्या नवीन इमारतीची स्थापना झाल्यापासून अनेक वर्षे बीड शहरवासीयांना घरपट्टी, नळपट्टी सोबतच इतर कर भरण्याकरिता इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर जावे लागत होते. तेव्हा पायऱ्या चढून जाताना वयोवृद्ध नागरिकांसह मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग असलेल्या बीड शहरवासियांची दमछाक होत होती. ही बाब लक्षात घेऊन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांच्यासोबत मुख्याधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन वसुली विभाग पहिल्या मजल्यावर हलविण्याची मागणी केली होती. तत्कालीन मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी या मागणीची नोंद घेऊन वसुली विभाग पहिल्या मजल्यावर हलविला. यामुळे कर भरणा करण्यासाठी येणाऱ्या बीड शहरवासीयांना होणारा मोठा त्रास कमी झाला आहे. आज कर भरणा करण्यासाठी गेलो असता कमी झालेल्या त्रासामुळे समाधान वाटले. शिवाय तिथे कर भरणा करण्यासाठी आलेल्यांपैकी काही जणांनी वसूली विभाग हलविण्याकरिता केलेल्या पाठपुराव्याबद्दल आभार ही व्यक्त केले. अशी माहिती मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली आहे.

## बीडमध्ये चॅम्पियन्स तायक्वांदो अकॅडमीत बेल्ट व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे चॅम्पियन्स तायक्वांदो अकॅडमीच्या वतीने बेल्ट व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात अकॅडमीतील विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू सन्मानित करण्यात आले व बेल्ट परीक्षेत यशस्वी झालेल्या खेळाडूंना बेल्ट व प्रमाणपत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला अशी माहिती डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर होते. प्रमुख पाहुणे म्हणून सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन पवार, ज्येष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात तसेच » पान २ वर

## आरक्षण उपवर्गीकरण रद्द करण्याची मागणी; दिंद्रुडमध्ये भव्य मोर्चा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या भूमिकेच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यातील धारूर व माजलगाव तालुक्यातील आंबेडकरी जनतेच्या वतीने मंगळवारी दिंद्रुड येथे भव्य मोर्चा व एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात हजारोंच्या संख्येने महिला, पुरुष, युवक व युवती सहभागी झाले होते. मोर्चाचे पुढे जाहीर सभेत रूपांतर झाले. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.'आरक्षणाला धक्का सहन करणार नाही'; असा निर्धार आंबेडकरी जनतेने यानिमित्ताने केला आहे.

जालना येथील उपवर्गीकरण विरोधी आंदोलनाच्या नेत्या रूक्मिणी लोंढे, भन्ते पय्यातीस, विजय साळवे, सचिन उजगरे तसेच बीड, जालना आणि लातूर जिल्ह्यातील आंबेडकरी नेत्यांच्या » पान २ वर



## गेवराई पोलिसांचा अवैध वाळू वाहतुकीवर प्रहार; २४ तासांत दोन कारवाया, २७.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

### हायवा आणि अशोक लेलँड सह वाळू जप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गेवराई पोलिसांनी अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात धडक मोहीम राबवत अवघ्या २४ तासांत दोन स्वतंत्र कारवाया करून तब्बल २७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलिसांनी विशेष पथक » पान २ वर



### पीटीआर वाटून फुकटचे श्रेय घेऊ नये–गटनेते शेख खाजा

## गोरगरीबांच्या हक्काचा पीटीआर तात्काळ द्या अन्यथा आंदोलन, गेवराई राष्ट्रवादीचा इशारा



**गेवराई । प्रतिनिधी**

चाळीस वर्षांपासून शहरातील अतिक्रमण धारकांच्या हक्काच्या पीटीआर च्या प्रश्नावर राजकीय पोळी भाजून राजकारण करणाऱ्यांनी केवळ निवडणुकीपुरता अतिक्रमण धारकांचा वापर केला. माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर मिळवून दिला. सुमारे अडीच हजार अतिक्रमण धारकांचे पीटीआर तयार असताना केवळ आचारसंहितेमुळे त्याचे निवडणुकीपूर्वी वाटप होऊ शकले नाही. निवडणुकीनंतर आ. विजयसिंह पंडित यांनी या बाबत आढावा बैठक घेऊन तात्काळ पीटीआर वाटपाचे निर्देश दिले होते. केवळ श्रेयासाठी गोरगरीब अतिक्रमण धारकांना वेठीस धरण्याचा प्रकार स्थानिक सत्ताधाऱ्यांनी केला आहे. कोणीही आता पीटीआर वाटून फुकटचे श्रेय घेऊ नये असा टोला राष्ट्रवादीचे नगर परिषदेतील गटनेते शेख खाजा यांनी लगावला आहे. तर गेवराई शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या » पान २ वर

## पारदर्शक कारभारासाठी विरोधकांच्या मागणीचा सत्ताधाऱ्यांकडून आदर करीत सभा तहकूब केली - नाईकवाडे

### गटनेत्यांना अभ्यास करण्यासाठी सभा चार दिवसांसाठी पुढे ढकलली

**बीड । प्रतिनिधी**

नगरसेवक डॉ. सारिका क्षीरसागर आणि खुर्शीद आलम यांना ठरावाच्या प्रति देण्यात आल्या होत्या पण त्यांनी आम्हाला अभ्यासासाठी वेळ द्यावा अशी मागणी केली. पारदर्शक कारभारासाठी हे आवश्यक असल्याने त्यांच्या मागणीचा आदर करीत कालची सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात आली. यामध्ये उलट सत्ताधाऱ्यांनी पारदर्शक कारभारासाठी ही भूमिका घेतली मात्र म्हणताताना सत्य चप्पल घालेपर्यंत खोटं गावभर हिंडून येतो असंच काहीस झालं. त्यांनी वेगळ्याच गोष्टी पेरल्या आहेत. पारदर्शक कारभारासाठी सत्ताधारी कधीच मागे हटणार नाही अशी ग्वाही नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दिली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)चे गटनेते खुर्शीद आलम भाजपच्या गटनेत्या सारिका ताई यांनी सभेतील ठरावांच्या प्रतींचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, या हेतूने सभा चार दिवसांसाठी पुढे » पान २ वर



## खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे भव्य प्रवेश सोहळा

### अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली माजलगावात शिवसेनेचे संघटन मजबूत!

**बीड । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटातील अनेक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत » पान २ वर



दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स अॅण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव
Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV